# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.08.2025** **वार- गुरुवार**

---

**प्रारूप प्रभागरचना**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठीची प्रारूप प्रभाग रचना आज संध्याकाळी सात वाजता महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे. पुणे महापालिकेमध्ये चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार निवडणुका होणार असून २०११ च्या जनगणनेनुसार शहरात १६५ नगरसेवक असतील.

**मिरवणूक वाद**

पुण्याच्या गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीसंदर्भात निर्माण झालेल्या वादावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज सर्व मंडळांची एकत्रित बैठक घेत तोडगा काढला. मिरवणूक सकाळी साडेनऊ वाजता सुरू होऊन यंदाही परंपरेनुसार आणि दरवर्षीच्या क्रमाने मिरवणूक होईल असा निर्णय यावेळी सर्व मंडळांकडून एकमताने घेण्यात आला आहे. यंदाच्या वर्षी काही मंडळांनी नियोजित वेळेआधीच विसर्जन मिरवणुकीत सहभाग घेण्याचा निर्णय घेतल्याने वाद निर्माण झाला होता.

**उत्सवांसाठी परवानगी**

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, गृहनिर्माण संस्था यांना गणपती उत्सवासाठी दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याची सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पोलीस आयुक्तालय यांनी संयुक्तपणे उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील तसेच मनपाच्या कार्यक्षेत्राबाहेरील मात्र पिंपरी चिंचवड पोलीस यांच्या क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात, देहू, आळंदी, देहूरोड कॅन्टोन्मेंट, शिरगाव, परंदवाडी, तळेगाव इत्यादी सर्व पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत येणारा परिसर आणि त्या परिसरातील सार्वजनिक मंडळे या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. या ऑनलाईन सुविधेचं हे सलग तिसरे वर्ष आहे.

**<u>वीजजोडणी खिडकीसुविधा</u>**

पुणे शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपात आणि त्वरित वीजजोडणी देण्यासाठी महावितरणने रास्ता पेठ येथील कार्यालयात एक खिडकी सुविधा उपलब्ध केली आहे. सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी केलं आहे. तात्पुरत्या वीजजोडणीसाठी गणेश मंडळांना मंजूर वीजभारानुसार अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

**<u>खड्डे तक्रारी</u>**

पुण्यातील रस्त्यांवरच्या खड्ड्यांची तक्रार थेट महापालिकेकडे करण्यासाठी पथ विभागाने तयार केलेल्या पीएमसी रोड मित्र ॲपवर पहिल्या आठ दिवसांत ४५४ तक्रारी आल्या आहेत. यापैकी ३८९ तक्रारींची महपालिकेनं दखल घेऊन त्यावर उपाययोजना केल्या असल्याची माहिती महापालिकेच्या पथविभागाचे प्रमुख आणि उपायुक्त अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांना दिली.

**<u>जप्ती मोहीम</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने मालमत्ता कर थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी जप्ती मोहिम हाती घेतली आहे. मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात ५ लाखांवरील थकबाकीदारांवर जप्ती मोहिम राबविण्यात येणार आहे.
२० ऑगस्ट ते २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ही  कारवाई केली जाणार असल्याचं कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितलं.

**<u>निर्धार परिषद</u>**

राज्य सरकारच्या मराठीविरोधी धोरणांना विरोध करण्यासाठी, ‘मराठी अभ्यास केंद्र’  आणि ‘मराठी देशाभिमानी संस्थे’  तर्फे, येत्या रविवारी मराठी आणि महाराष्ट्राची निर्धार परिषद आयोजित करण्यात आली आहे. परिषदेमध्ये मराठी भाषा, संस्कृती, शिक्षण, साहित्य, नाटक, चित्रपट तसेच सामाजिक-राजकीय प्रश्नांवर चर्चासत्रे, व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेतअशी माहिती संयोजक समितीने  दिली आहे.

**<u>इंदिरा अत्रे पुरस्कार</u>**

स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे पुरस्कृत 'इंदिरा अत्रे बालसाहित्य' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून यंदा डॉ. शंतनू अभ्यंकर यांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात येणार आहे. अन्य पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये राजीव तांबे, चंद्रशेखर जोशी, वर्षा चौगुले, संजीवनी बोकील यांचा समावेश आहे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्काराचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते येत्या २९ ऑगस्टला पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.

**<u>पर्यटनस्थळे बुकिंग</u>**

पुण्यातील लोणावळा खंडाळा या प्रसिद्ध पर्यटन स्थळांसह अनेक ठिकाणांना पर्यटकांकडून पसंती मिळते. मात्र, अनियंत्रित आणि बेजबाबदार गर्दीमुळे अनेकदा छोट्या मोठ्या स्वरूपाच्या दुर्घटना आणि अपघात घडतात.

हे टाळण्यासाठी जिल्ह्यातील महत्त्वाच्या 22 पर्यटन स्थळांवर जाण्यापूर्वी ऑनलाइन बुकिंग अनिवार्य करण्याचा निर्णय पुणे  जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. या ठिकाणांमध्ये सिंहगड किल्ला, अंधारबन, राजगड, तोरणा, कामशेत, शिवनेरी किल्ला, मढे घाट, यासह विविध ठिकाणांचा समावेश आहे. या ठिकाणांवर मर्यादित संख्येने पर्यटकांना प्रवेश दिला जाणार आहे. ऑनलाइन बुकिंग करताना त्या ठिकाणी थांबण्यासाठी वेळेची मर्यादा घातली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागानं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**